सूचना का अधिकार RIGHT TO INFORMATION

महाराष्ट्र शासन

# INSTITUTE OF NURSING EDUCATION MUMBAI

परिचर्या शिक्षण संस्था, मोटलीबाई इमारत, सर ज.जी.रुग्णालय आवार, भायखळा, मुंबई

Bai Motlibai Building, Sir J.J.Hospital Campus, Byculla, Mumbai – 400 008

E-mail – mumbai.ine@gmail.com www.inemumbai.org Tel.23744655

जा.क्र.पशिसं/आ-३/उपहागृह/कोटेशनतीन लिफाफा/ 202 /२०२६ दि. 03/02/२०२६

प्रति,

-----------------

-----------------

-----------------

विषय :- परिचर्या वसतीगृहात उपहारगृह सुविधा सुरु करण्यासाठी निवेदा मागविण्याबाबत.

संदर्भ:- जा.क्र.पशिसं/आ-३/उपहारगृह/परिचर्या वसतीगृह/३३/२०२६ दि. ०५/०१/२०२६

उपरोक्त विषयान्वये परिचर्या शिक्षण संस्था,मुंबई यांचा अधिपत्याखाली वसतीगृहामध्ये संदर्भ क्रं.०१ नुसार उपहारगृह सुरु करण्यासाठी विद्यार्थी कल्याण संघटने मार्फत निवेदन सादर केले आहे. परिचर्या वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वच्छ,पौष्टिक व नियमित जेवणाची सुविधा उपलब्ध होण्यासाठी उपहारगृह सुरु करण्याची आवश्यकता आहे.

परिचर्या शिक्षण संस्थेच्या अधिनस्त असलेल्या वस्तीगृहातील उपहागृह भाडेतत्वावर चालविण्यासाठी स्थानिक बाजारातून अल्पोहार व जेवण (खाद्य पदार्थांचे ) दर मागविण्यात येत असून सदर पत्र प्राप्त झालेल्या दिनांकापासून सात दिवसांत कोटेशन व दर सादर करणे बंधनकारक राहील.

तसचे उपहारगृहातील अल्पोहार व जेवण (खाद्यपदार्थांचे ) दर सादर करण्यात येणा-या तक्त्यावर अल्पोहार व जेवणाचे दर असे स्पष्ट नमूद करण्यात यावे. तसेच उपहारगृह चालविण्यास देण्याचा अंतिम अधिकार हा संस्था प्रमुखांचा राहील.

परिचर्या वसतीगृहात उपहारगृह सुरु करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्यास आपण इच्छुक असल्यास दरपत्रकाचा अनु. क्रमांक व तारीख आणि विषय उल्लेखित केलेल्या मोहरबंद लिफाफयात पूर्ण भरलेले दरपत्रक तयार करुन अधिष्ठाता, परिचर्या शिक्षण संस्था, सर ज. जी. रुग्णालय, मुंबई यांच्या नावे प्रशासकीय कार्यालयात दिनांक ०८ / ०२ /२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यन्त स्विकारले जातील.

## अटी व शर्ती

१. संबंधित ठेकेदारास वसतीगृहाची शासकीय जागा भाडेतत्वावर (ज्याचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणीत करण्यात येई पर्यत) चालविण्यासाठी देण्यात येत आहे. संबंधित ठेकेदारांनी दर महिन्याच्या १० तारखेच्या आत उपहारगहाचे मासिक भाडे रु.४०००/- व पाणी शुल्क रु.१०००/- प्रमाणे एकूण रु.५०००/- कार्यालयाचा रोखपाल यांचाकडे जमा करावे.

२. करार कालावधीतील उपहारगृहाची विज देयके भरावीत. वीज देयके प्रलंबित ठेवू नये. अन्यथा २ महिन्यापेक्षा जास्त देयके थकीत झाल्यास हे आदेश रदद करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांच्याकडे राखून ठेवले आहे.

३. करार कालावधीतील उपहारगृहाची सेवा, खाद्यपदार्थाची चव, करारात स्वीकारलेली किंमत (उपहारगृह समिती व सघंटना संयुक्तपणे ठरवेल) आण स्वच्छता त्याप्रमाणे कर्मचायांचे सेवाा व वर्तणुक उपहारगृह समितीमार्फत वेळोवेळी मुल्यमापण करण्यात येईल. आवश्यकता असल्यास भेट देण्यात येईल.

४. सदरचा करार हा दि.०१/०८/२०२४ पासून ११ महिन्याच्या तत्वावर देण्यात येत असून उपहारगृह ठेकेदारा मार्फत चालविण्यात येणाया सेवा समाधानकारक नसेल तर करार चालू ठेवता येणार नाही. तसेच पुढे करार चालु ठेवता येणार नाही तसेच पुढे करार चालु ठेवायचा असल्यास सेवा समाधानकारक असेल तर किंवा कसे याबाबतचा निर्णय उपहारगृह समिती येईल.

५. शासन नियमानुसार उपहारगृहात बालकामगार ठेवता येणार नाही व तसे आढळल्यास तात्काळ कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

६. उपहारगृहातील संस्थेची जी साधन साम्रगी व फर्निचर आहे, त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

७. उपहारगृहात बनविण्यात येणारे खाद्यपदार्थ शुध्द रिफाइन्ड गोडतेलात व ताजे बनवून विद्यार्थ्यांना देणे बंधनकारक राहील.

८. स्वयंपकासाठी लागणारे पदार्थ उदा.तेल,तुप,अंडी,मास,कडधान्य व इतर सर्व खाद्यपदार्थ्यांची गुणवता व दर्जा चांगला ठेवण्याची जबाबदारी संबंधित संघटनेची राहील.

९. उपहारगृहात कोणत्याही खाजगी उत्पादनाची जाहिरात करता येणार नाही.

१०.उपहारगृहात अग्नीविरोध (अग्निशामक यंत्र) पुरेशा प्रमाणात उपहारगृहात लावणे बंधनकारक आहे.

११.सदर उपहारगृह चालविण्यापोटी ठेव रक्कम म्हणून रु.१,००,०००/- (अक्षरी रु.एक लाख केवळ) इतक्या रक्कमेची प्राचार्य कार्यालयाकडे अधिष्ठाता, प्राचार्य शिक्षण संस्था,मुंबई यांच्या नावाने जमा करावी लागेल.

१२.उपहारगृहात कोणत्याही संपत्तीचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

१३.उपहारगृहात काम करणारे स्वयंपाकी,वेटर,साफसफाई करणारे मनुष्यवळ यांची व्यवस्था ठेकेदारानी करावयाची वेतनदेण्याची जबाबदारी संबंधीताची राहील.

१४.उपहारगृह कामगार निटनिटके राहतील व त्यांची वर्तणुकनम्रतेची असेल याबाबतची खबरदारी संबधित ठेकेदाराची आहे.

१५.सदर उपहारगृहातील कर्मचा-यांची वर्षातून दोनदा वैद्यकीय तपासणी करणे बंधनकारक आहे.

१६.उपहारगृहातील स्वयंपाकगंहामध्ये स्वच्छता ठेवण्यात यावी.उपहारगृह समिती सदस्य केव्हाही अचानक भेट देऊ शकतात.

१७.विद्यार्थी कल्याण प्रतिनीधी , परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई यांच्या अधिपत्याखालील केलेला करार कार्यालयास सादर करावा, तसेच कराराची प्रत्येक ११ महिन्यांनी नुतनीकरण केलेली प्रत वेळोवेळी विहीत वेळेत सादर करावी. सदर करार रु.५००/च्या मुद्राकपेपरवर नोटरी केलेले असावा.

१८ सदर उपहारगृह चालविताना आवश्यक त्या सर्व अनुज्ञपत्या व प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेणे बंधनकारक महानगरपालिका यांच्या अनुज्ञापना खात्या कडील (लायसन्स डिपार्टमेट) मुंबई महानगरपालिका अधिनियम १९६२) अनुसुचित एम मधील कलम ३९४ प्रमाणेचे अनुज्ञापन (लायसन्स) घेण्यात यावे. तसेच अन्न व औषध यांचेकडुन योग्य ता परवाना (The Food safety and standard act,२००६ Rule and Regulation २०११) Registration अन्न् सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ यांचे नोंदणी प्रमाणपत्र, सुक्ष्म, लघु और मध्यम उद्यम मंत्रालय नोंदणी प्रमाणपत्र,महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम,२०१८ नमुना दिल्याबाबत पावती,फार्म II-A,FORM-B,Mumbai Municipal Corporation हे प्रमाणपत्रे आदेश प्राप्त होताच.

१९ पीण्याचे पाणी Filter water with cooler देण्यात यावे.

२० Morning time ६.०० am to १०.०० pm. मुंलीचे वसतीगृह असल्यामुळे १० वाजल्या नंतर कर्मचारी उपहारगहा मध्ये थांबणार नाही.

२१ महिला कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

२२ Menu with Price list घेणे.

२३ सविस्तर अटी व शर्ती वाचून दरपत्रक भरण्यात यावे.

(डॉ. अजय भंडारवार),
अधिष्ठाता,
परिचर्या शिक्षण संस्था,
सर ज. जी. रुग्णालय, मुंबई